संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# शिक्षण आणि नोकरीचा बाजार

**शिक्षण** आणि नोकरी यामध्ये किती व्यस्त प्रमाण आहे, हे नुकत्याच जाहीर झालेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या निकालावरून स्पष्ट होते. राज्य लोकसेवा आयोगामार्फत अधिकारी स्तरावरची नोकरभरती स्पधा परीक्षेच्या माध्यमातून केली जाते. या परीक्षेत यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांना पोलीस उपनिरीक्षक. तहसिलदार, उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी किंवा सचिवांपर्यंतच्या नोकऱ्यांचा मान मिळू शकतो. अर्थातच ही परीक्षा अभ्यासाच्या दृष्टीने कठीण स्वरूपाची असते. त्यात विचारले जाणारे लेखी परीक्षेतले प्रश्न हे इतिहास, भूगोल, सामान्य ज्ञान काही प्रमाणात गणित आणि अलीकडे संगणकीय विषयाशी संबंधित असतात. नुकत्याच लागलेल्या महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत गेल्या वर्षीप्रमाणे अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांनी मजल मारल्याचे स्पष्टपणे दिसून येते. तर या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांची त्यांच्या अभ्यासक्रमाप्रमाणे वर्गवारी केली तर चित्र खूप वेगळे असल्याचे दिसून येईल. एकूण परीक्षार्थी विद्यार्थ्यांची संख्या बघितली तर त्यात कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांची संख्या अधिक असते.या परीक्षेकरता कोणत्याही शाखेचा पदवीधर पात्र समजला जातो. गेल्या पाच वर्षांपासून अभियांत्रिकी शाखेचे अनेक विद्यार्थी राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचा पर्याय निवडू लागल्याचे दिसून येते. कला, वाणिज्य, विज्ञान यांचे पदवीपर्यंतचा अभ्यासक्रम यामध्ये कमालीचा फरक असतो. अभियांत्रिकी महाविद्यालयात जवळपास सगळाच अभ्यास इंग्रजी भाषेतून होतो. काही प्रमाणात गणित, विज्ञानाचा सराव या विद्यार्थ्यांना झालेला असतो. राज्य लोकसेवा आयोगाच्या प्रश्नपत्रिकांमध्ये विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांचे स्वरुप हे अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या अभ्यासाशी बऱ्याच प्रमाणात मिळते जुळते राहते. त्यातही त्यांची अभ्यासाला वेळ देण्याची प्रवृत्ती असल्यामुळे हे विद्यार्थी यशस्वी होऊ शकतात. त्या तुलनेत कला, किंवा वाणिज्य शाखेचे विद्यार्थी यशस्वी होऊ शकत नाहीत. कला, वाणिज्य अभ्यासक्रम निवडून पदवीधर होणाऱ्यांची संख्या महाराष्ट्रात प्रचंड आहे. परंतु त्यांना नोकऱ्यांच्या संधी फारशा उपलब्ध होत नाहीत. किंबहुना नोकऱ्याच उपलब्ध नाहीत. सरकारी कार्यालयांमध्ये नोकरभरतीवर बंधने आहेत. खाजगी कंपन्यांमध्ये नोकरी स्वीकारताना बऱ्याच मोठ्या स्पर्धेला त्यांना तोंड द्यावे लागते. आपण घेतलेल्या पदवीपेक्षाही संगणकाचे ज्ञान अधिक आवश्यक मानले जाते. अशा परिस्थितीत महाराष्ट्रात शिकवला जाणारा अभ्यास आणि बेकार तरुणांची निर्माण होणारी फौज याचा विचार केला तर या दोन शाखांच्या अभ्यासक्रमामध्ये काळानुसार आणखी बदल करण्याची वेळ आलेली आहे.

### बी.ए. बीकॉम विद्यार्थ्यांची परवड

सध्याची महाराष्ट्रातील बेरोजगारीची परिस्थिती गंभीर स्वरुपाची आहे. जिल्हा, तालुका स्तरावर कला, वाणिज्य अभ्यासक्रमांना होणारी गर्दी हा एक नाइलाजाचा भाग ठरतो. कमी टक्केवारीमुळे अनेकांना विज्ञान शाखेमध्ये प्रवेश मिळत नाही. किमान पदवीधर झाल्याशिवाय नोकरीच्या बाजारात कोणीही विचारत नाही. अशा परिस्थितीत राज्य सरकारकडून घेतल्या जाणाऱ्या लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचा विचार होण्याची गरज आहे. शासकीय सेवेमध्ये तरुणांना सहभागी करून घेताना कला, वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी वेगळा विचार करण्याची गरज आहे. विशेषतः कारकून किंवा क्लार्क स्तरावर होणारी सरकारी नोकरभरती ही कला, वाणिज्य शाखेच्या विषयांसाठी राखीव असली पाहिजे. सरकारच्या विज्ञान तंत्रज्ञानाशी संबंधित प्रकल्पांकरिता विज्ञान आणि अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचा विचार केला पाहिजे. अन्यथा बीए, बीकॉम होणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरीची दारेच बंद होण्याची शक्यता आहे. जवळपास पाच वर्षे हा अभ्यासक्रम शिकल्यानंतर धड आठ दहा हजाराची नोकरीही मिळू शकत नसेल तर मग या अभ्यासक्रमाची गरजच काय, असा प्रश्न निर्माण होतो. बीए, बीकॉमच्या अभ्यासक्रमामध्ये काही बदल करण्याची काळानुसार गरज निर्माण झाली आहे. संगणकावर आधारित आणि तंत्रज्ञानाचा काही प्रमाणात परिचय करून देणारा अभ्यासक्रम जोडला गेला पाहिजे. हे अभ्यासक्रम करीत असताना नोकरी किंवा व्यवसाय करता येऊ शकेल, अशी विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली गेली पाहिजे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात अतिशय गंभीर परिस्थिती आहे. आणि त्याचा सर्वाधिक सामना कला, वाणिज्य शाखेतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना करावा लागतो. अधिकारी स्तरावरच्या भरतीकरता जर राज्य लोकसेवा आयोग परीक्षा घेत आहे आणि त्यातून विद्यार्थ्यांची निवड करीत आहे तर मग क्लार्क स्तरावरच्या कर्मचाऱ्यांच्या भरतीकरतासुध्दा आणि त्यातही प्रामुख्याने कला वाणिज्य विद्यार्थ्यांसाठी अशी स्पर्धा परीक्षा गेल्या अनेक वर्षांत का घेतली गेली नाही, असा प्रश्न निर्माण होतो.

### राज्य लोकसेवा परीक्षेचा संदेश

अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांनी राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत बाजी मारली, याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेतच. परंतु त्याचा दुसरा अर्थ असा होतो की, आज अभियांत्रिकी क्षेत्रातून पदवीधर होणाऱ्यांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे. महाराष्ट्रात दरवर्षी २५ते ३० हजार अभियांत्रिकी विद्यार्थी बाहेर पडतात. परंतु त्यांच्या या ज्ञानाचा उपयोग करून घेणारी कोणतीही सक्षम व्यवस्था किंवा यंत्रणा आपल्याकडे नाही. महाविद्यालयांमधून होणारी प्लेसमेंट हीसुध्दा खूप मर्यादित होऊ लागली आहे घाऊक प्रमाणात अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू झाल्यामुळे गुणवत्तेवरही परिणाम झालेला आहे. आज तर अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचासुध्दा बोजवारा उडालेला दिसून येतो. महाविद्यालयांमधून ठोस काही शिकवले जात नाही. विद्यार्थ्यांना बाहेर क्लासेस लावून अभ्यास पूर्ण करावा लागतो. किंवा पदवी घेतल्यानंतर नोकरीच्या बाजारात तेवढ्या जोरावर स्थान मिळत नाही. सॉफ्टवेअर, हार्डवेअर, किंवा सीडॅक यासारख्या माध्यमांचा वापर करून या अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना आपले ज्ञान अपडेट करावे लागते. तरच नोकरीची संधी मिळण्याची शक्यता असते. म्हणूनच शिक्षण आणि नोकरीचे हे व्यस्त प्रमाण तातडीने सुधारण्याची वेळ आलेली आहे. राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेच्या निकालातील हाही एक संदेश आहे.